09 JAN 2025
लोकमत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

सामूहिक वाचन उपक्रमाला वाचकांचा प्रतिसाद; कुलगुरूंचाही सहभाग

# विद्यापीठातील कट्ट्यांनी पुन्हा अनुभवले 'वाचणारे' विद्यार्थी

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** एक रम्य सायंकाळ... मावळतीकडे झुकणारी सूर्यकिरणे... निसर्गरम्य उद्यान... त्या उद्यानातील कट्ट्यांवर बसून आपल्या आवडीची पुस्तके वाचणारे विद्यार्थी-विद्यार्थिनी... ऑनलाइन लर्निंग आणि ई-बुक्सच्या जमान्यामध्ये दुर्मीळ होऊ घातलेले हे दृश्य पाहायला मिळाले ते शिवाजी विद्यापीठातील बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्रासमोरील उद्यानामध्ये! निमित्त होते महाराष्ट्र शासनाच्या 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' या पंधरवड्यानिमित्त विद्यापीठाने आयोजित केलेल्या 'एक तास सामूहिक वाचनासाठी' या उपक्रमाचे!



विद्यापीठात 'एक तास सामूहिक वाचनासाठी' या उपक्रमांतर्गत कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. प्रमोद पाटील, डॉ. धनंजय सुतार, डॉ. महादेव देशमुख, डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. शरद बनसोडे यांनी पुस्तकाचे वाचन केले.

विद्यापीठातील अधिकारी, अधिविभागांचे प्रमुख, शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी-विद्यार्थिनी यांच्यासाठी सामूहिक वाचन उपक्रम बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्रासमोरील उद्यानामध्ये आयोजित केला.

कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्यासमवेत प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख आणि डॉ. श्रीकृष्ण महाजन, शिक्षक, अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी सायंकाळी चार वाजता आवडीची पुस्तके घेऊन उद्यानात जमले. उद्यानातील सर्व कट्टे त्यांनी भरून गेले. अपेक्षेपेक्षा अधिक वाचक आल्याने परिसरात खुर्च्या मांडूनही बसण्याची व्यवस्था ज्ञानस्रोत केंद्राकडून केली. ऐनवेळी उपस्थित झालेल्या वाचकांसाठी ग्रंथालयातील पुस्तके मोफत उपलब्ध करण्याची सुविधाही दिली. यावेळी वाचकांनी बहुविध विषयांच्या पुस्तकांची निवड वाचनासाठी केल्याचे दिसून आले. कुलगुरू डॉ. शिर्के यांनी शांता शेळके यांचे 'वडीलधारी माणसे', प्र-कुलगुरू डॉ. पाटील यांनी यशवंतराव चव्हाण यांच्याविषयीचे 'विकासाचे यशवंतयुग', तर कुलसचिव डॉ. शिंदे यांनी सूर्यकांत मांढरे यांचे 'कोल्हापुरी साज' हे पुस्तक वाचले. या उपक्रमानंतर कुलगुरू डॉ. शिर्के यांनी, विद्यार्थ्यांनी पुस्तकवाचनाला प्राधान्य द्यावे, वाचनाची प्रक्रिया सातत्याने सुरू राहावी, यासाठी हा उपक्रम आयोजित केल्याचे सांगितले.

09 JAN 2025

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# लेखक, विद्यार्थी वाचन संवाद उपक्रमास प्रतिसाद

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ येथे 'लेखक व विद्यार्थी वाचन संवाद' उपक्रमांतर्गत आयोजित व्याख्यान वाचन संकल्प महाराष्ट्राचा या उपक्रमांतर्गत आयोजित लेखक व विद्यार्थी वाचन उपक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

यावेळी अरविंद देशपांडे, माजी समन्वयक विस्तार सेवा केंद्र, सांगली तथा 'सृजनाची स्वप्नं जागवताना' या पुस्तकाचे लेखक यांची प्रकट मुलाखत अधिविभाग प्रमुख डॉ.एस. बी. पाटील यांनी घेतली. देशपांडे यांनी समन्वयक, शिक्षक व नरेंद्र विद्यापीठाचे संस्थापक संचालक म्हणून राबवलेल्या नावीन्यपूर्ण उपक्रमांची माहिती दिली. त्याबरोबरच वाचनीय पुस्तके, ग्रंथपालांची उपक्रमशीलता, ग्रंथालयांचे महत्त्व, समाजोपयोगी उपक्रम याबाबत उपस्थित विद्यार्थी यांच्याशी संवाद साधला.

प्रास्ताविक अधिविभागप्रमुख डॉ. एस. बी. पाटील यांनी केले. कार्यक्रमास डॉ. डी. बी. सुतार यांनी ग्रंथपरीक्षण कसे करावे, याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी उपग्रंथपाल डॉ. पी. बी. बिलावर, वरिष्ठ ग्रंथालय सहायक डॉ. धनंजय गुरव, डॉ. आर. डी. खामकर आदी उपस्थित होते. आभार सहायक प्राध्यापक विनोद गुरव यांनी मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
09 JAN 2025
पुढारी

# प्रा. डॉ. मंजिरी मोरे-देसाई यांना आधुनिक सावित्री पुरस्कार



**कोल्हापूर :** महाराष्ट्र माहिती - तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र संचलित करिअर कट्टा उपक्रमांतर्गत प्रा. डॉ. मंजिरी अजित मोरे-देसाई यांना 'आधुनिक सावित्री पुरस्कार २०२५' जाहीर झाला आहे. क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त या पुरस्कारांची घोषणा करण्यात आली.

प्रा. डॉ. मंजिरी मोरे-देसाई या गोपाळ कृष्ण गोखले कॉलेज, येथे कार्यरत असून संशोधन आणि शिक्षण क्षेत्रात त्यांचे उल्लेखनीय योगदान आहे. शिवाजी विद्यापीठ सिनेट सदस्य म्हणून त्यांनी उच्च शिक्षणातील अनेक समस्यांचे निराकरण केले आहे. त्यांनी व्यावसायिक अभ्यासक्रम, प्लेसमेंट सेल आणि विद्यार्थी विकासासाठी महत्त्वपूर्ण उपक्रम राबवले आहेत.

0 9 JAN 2025
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. जी. डी. यादव यांना भटनागर फेलोशिप



कोल्हापूर, ता. ८ : ज्येष्ठ शास्त्रज्ञ प्रा. डॉ. जी. डी. यादव यांना कौन्सिल ऑफ सायंटिफिक ॲन्ड इंडस्ट्रियल रिसर्चतर्फे (सीएसआयआर) प्रतिष्ठित भटनागर फेलोशिप प्रदान करण्यात आली. ही फेलोशिप सीएसआयआरच्या निवड समितीच्या मंजुरीने आणि विज्ञान व तंत्रज्ञान राज्यमंत्री डॉ. जितेंद्र सिंह यांच्या मान्यतेने देण्यात आली.

डॉ. यादव सध्या राष्ट्रीय विज्ञान अध्यक्षपदी कार्यरत असून, लक्ष्मीनारायण इनोव्हेशन टेक्नॉलॉजीकल विद्यापीठाच्या बोर्ड ऑफ गव्हर्नर्सचे अध्यक्ष आहेत. ते इन्स्टिट्यूट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी, मुंबईचे माजी कुलगुरू आहेत. विज्ञान, तंत्रज्ञान, नवकल्पना आणि धोरण क्षेत्रात त्यांचे भरीव योगदान आहे. त्यांना आजवर १५० हून अधिक राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पुरस्कारांनी सन्मानित केले आहे. त्यांचे संशोधन नेट-झिरो उत्सर्जन, हरित हायड्रोजन निर्मिती, कार्बन डायऑक्साईड रिफायनरी, कचऱ्याचे पुनर्मूल्यांकन या क्षेत्रात आहे. त्यांचे ५७० संशोधन पेपर्स, १३६ पेटंट्स, आणि तीन पुस्तके प्रकाशित झाली आहेत. ते अनेक आंतरराष्ट्रीय जर्नल्सच्या संपादकीय सल्लागार मंडळांवर आहेत. ते इंडियन केमिकल सोसायटीच्या शताब्दी जयंती वर्षातील अध्यक्षपद भूषवित आहेत.

09 JAN 2025

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# गारवेल कुळातील वनस्पतीच्या नवीन प्रजातीचा शोध

## प्रा. विनोद शिंपले, सुजित पाटील, आम्रपाली कट्टी यांचे संशोधन; 'आयपोमिया सायमोसियाना' असे नामकरण

कोल्हापूर, ता. ८ : न्यू कॉलेजमधील प्रा. डॉ. विनोद शिंपले, संशोधक विद्यार्थी सुजित पाटील आणि इचलकरंजी येथील दत्ताजीराव कदम आर्टस् सायन्स महाविद्यालयातील प्रा. डॉ. आम्रपाली कट्टी यांनी सह्याद्री पर्वतरांगेतील पाटेश्वर डोंगर रांगेतून गारवेल कुळातील वनस्पतीच्या नव्या प्रजातीचा शोध लावला आहे. त्यांचे याबाबतचे संशोधन



पाटेश्वर डोंगर रांगेतून शोधलेली गारवेल कुळातील वनस्पतीची नवी प्रजाती.

या आंतरराष्ट्रीय जर्नलमध्ये प्रकाशित झाले.

या वनस्पतीचे 'आयपोमिया सायमोसियाना' असे नामकरण या संशोधकांनी केले. इंग्लंड येथील क्यू बोटॅनिक गार्डनमधील ज्येष्ठ संशोधक डॉ. अनारीटा सायमोस रीडीया यांच्या गारवेल कुळातील वनस्पतींच्या



प्रा. विनोद शिंपले



डॉ. कट्टी



सुजित पाटील

संशोधनातील विशेष गौरव करण्यासाठी या वनस्पतीला सायमोसियांना नाव दिले आहे. या वनस्पतीवर बारा वर्षापासून संशोधन सुरू होते. या वनस्पतीचे साधर्म्य दाखवणाऱ्या इतर वनस्पतींचा अभ्यास करण्यासाठी प्रा. शिंपले यांनी सिंगापूर, पॅरिस येथील वनस्पती उद्यानास भेट दिली. त्यानंतर या संशोधनाला आंतरराष्ट्रीय स्तरावर मान्यता देण्यात आली. ही वनस्पती केवळ सातारा शहराच्या पूर्वेस असणाऱ्या पाटेश्वर डोंगर रांगेवरच आढळते. साधारणतः ५० ते ६० वेली अस्तित्वात असल्याने त्याचे संवर्धन करणे आवश्यक असल्याचे प्रा. शिंपले यांनी सांगितले. या संशोधन कार्यास न्यू कॉलेजचे प्राचार्य डॉ. व्ही एम पाटील, श्री. प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊसचे चेअरमन के. जी. पाटील यांचे सहकार्य लाभले.

### पिवळ्या रंगाची फुले, त्रिकोणी बिया

या वनस्पतीस ऑगस्ट ते ऑक्टोबर दरम्यान फुले व फळे येतात. फुले पिवळ्या रंगाची असून, आकर्षक दिसतात, तर बिया त्रिकोणी व मुलायम केसयुक्त असतात, अशी माहिती प्रा. शिंपले यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
09 JAN 2025
पुण्यनगरी

# 'शरद'मध्ये उद्योजकता जागरुकता कार्यशाळा

**जयसिंगपूर :** यड्राव येथील शरद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग येथील सिव्हिल इंजिनिअरिंग विभागामध्ये शिवाजी विद्यापीठ रिसर्च अँड डेव्हलपमेंट फाऊंडेशन, इंडो जर्मन टूल रूम यांच्या वतीने दोन दिवसीय उद्योजकता जागरुकता विषयावर कार्यशाळा संपन्न झाली. यामध्ये शिवाजी विद्यापीठ, इंटरडिसिप्लिनरी स्टडीजचे प्रमुख डॉ. पी. डी. राऊत, इंडियन कॉमर्स असोसिएशनचे फेलो आणि महाराष्ट्र कॉमर्स असोसिएशनचे फेलो, माजी प्राचार्य डॉ. ए. एम. गुरव यांनी मार्गदर्शन केले. कार्यशाळेचे आयोजन सिव्हिल विभागातील प्रा. ए. बी. जाधव, प्रा. पी. आर. पाटील यांच्यासह विभागातील प्राध्यापक यांनी केले. यासाठी संस्थेचे एक्झिक्युटिव्ह डायरेक्टर अनिल बागणे यांचे मार्गदर्शन व प्राचार्य डॉ. एस. ए. खोत यांचे सहकार्य लाभले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
09 JAN 2025
सकाळ

# सुप्रिया तावडेला थाळीफेकमध्ये 'रौप्य'



सोनाळी : शिवाजी विद्यापीठात दिव्यांगांसाठी घेतलेल्याचौथ्या राज्यस्तरीय पॅरा ॲथलिटिक्स चॅम्पियनशिप स्पर्धेत कंळबा (ता. करवीर) येथील सुप्रिया किशोर तावडे हिने थाळीफेक, भालफेक क्रीडा प्रकारात रौप्यपदक पटकावले. सुप्रिया कसबा बीड येथील सूर्यकांत दिंडे महाविद्यालयात बी.एस्सी.च्या प्रथम वर्षात शिकत आहे. तिला महाराष्ट्र राज्य पॅरा असोसिएशनचे अध्यक्ष नंदकुमार नाळे यांच्या हस्ते पदक दिले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
09 JAN 2025
तरुण भारत




राजस्थानला रवाना झालेला शिवाजी विद्यापीठाचा नेटबॉल महिला संघ.

# शिवाजी विद्यापीठचा नेटबॉल महिला संघ जयपूरसाठी रवाना

**कोल्हापूर :** राजस्थानमधील जयपूर येथील ग्यान विहार विद्यापीठात ७ जानेवारी ते ९ जानेवारी दरम्यान होणाऱ्या अखिल भारतीय महिला नेटबॉल स्पर्धेत शिवाजी विद्यापीठ महिला संघ प्रथमच सहभाग घेणार आहे. शिवाजी विद्यापीठ प्रशासनाकडून खेळाडूंना सर्वोतोपरी सुविधा पुरवण्यात आल्या आहेत. या संघामध्ये साक्षी कदम (मिरज महाविद्यालय), वैष्णवी मुळीक (आर्टस् अँड कॉमर्स कॉलेज,मायणी), वैष्णवी आंबी (गव्हर्नमेंट इंजिनिअरिंग कॉलेज कराड), काजल राठोड (ए सी एस कॉलेज, पलूस), अंजली माने (ए सी एस कॉलेज, पलूस), मीनल मकानदार ( शिवराज महाविद्यालय गडहिंग्लज), समीक्षा चौगुले (कन्या महाविद्यालय मिरज), सुप्रिया लोखंडे (घोडावत कन्या महाविद्यालय जयसिंगपूर), समृद्धी नवले ( कॉलेज नॉन कॉन्व्हशनल सायबर कोल्हापूर), सलोबर मुल्ला (कमला कॉलेज कोल्हापूर), उत्कर्षा तरवाळ (आजरा महाविद्यालय आजरा), सौख्या पाटील (डी वाय पाटील कॉलेज ऑफ इंजीनियरिंग) यांचा समावेश आहे. महिला नेटबॉल संघाचे स्पर्धापूर्व शिबीर डॉ. धनंजय पाटील (आजरा महाविद्यालय,आजरा), प्रा. पूजा राठोड(कमला कॉलेज,कोल्हापूर) यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडले. या सर्वांना शिवाजी विद्यापीठचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे यांचे प्रोत्साहन लाभले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
09 JAN 2025
पुढारी

# एमबीए, एमसीए प्रवेश परीक्षेसाठी अर्ज करण्याची २५ जानेवारीपर्यंत मुदत

कोल्हापूर : 'डीटीई'कडून एमबीए व एमसीए प्रवेश परीक्षेसाठी अर्ज करण्याची प्रक्रिया सुरु झाली असून अर्ज करण्याची अंतिम तारीख २५ जानेवारी आहे. विद्यार्थी-विद्यार्थिनींनी www. mahacet. org या संकेस्थळावर जाऊन अर्ज भरावेत, अशी माहिती शिवाजी युनिव्हर्सिटी मॅनेजमेंट टीचर्स असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. बापूसाहेब सावंत, सचिव डॉ. प्रवीण जाधव यांनी दिली. यावर्षीची एमबीए प्रवेश परीक्षा १, २ व ३ एप्रिल तर एमसीएची प्रवेश परीक्षा २३ मार्चला होणार आहे. परीक्षेसाठीचे अर्ज भरण्यास सुरुवात झाली आहे. प्रवेश परीक्षा दिली तरच शासनाकडून मिळणाऱ्या वेगवेगळ्या सवलतींसाठी विद्यार्थी पात्र ठरतात. परीक्षेमुळे शैक्षणिक शुल्कात सवलती मिळतात. तरी विद्यार्थ्यांनी प्रवेश परीक्षा द्यावी, असे आवाहन 'सुम्टा'च्या वतीने करण्यात आले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
09 JAN 2025
पुढारी

# डी.एड. विद्यार्थ्यांनी घेतली दूरशिक्षणाच्या अभ्यासक्रमाची माहिती

कोल्हापूर : रुकडी येथील रयत शिक्षण संस्थेच्या छत्रपती शाहू डी.एड. कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राला शैक्षणिक क्षेत्रिय भेट दिली. केंद्राचे प्र-संचालक डॉ. कृष्णा पाटील यांनी सुरू असलेल्या विविध अभ्यासक्रमाची माहिती दिली. यावेळी सहा. प्राध्यापक डॉ. नितीन रणदिवे यांनी स्वागत केले. यावेळी उपकुलसचिव व्ही. बी. शिंदे, सहा. कुलसचिव दिलीप मोहाडीकर, प्रा. डॉ. राम चट्टे, प्रा. डॉ. कांचन खराटे, प्रा. डॉ. मीनल पाटील, एम. बी. ए. समन्वयक सुप्रिया मोगले व विद्यार्थी उपस्थित होते.